आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २५६ वा ● रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●


## सर्वांचे घराचे स्वप्न पूर्ण करणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे, (जिमाका) : प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीचे स्वत:चे घर असावे, असे स्वप्न असते. हे शासन सर्वांच्या घराचे स्वप्न पूर्ण करणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह,



आयोजित कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा विभागीय घटक) म्हाडा सदनिका सोडत २०२३-२४ संगणकीय सोडत कार्यक्रमात ते बोलत होते. कोंकण विभागातील ५ हजार ३११ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत आयोजित केले होती. यावेळी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधानपरिषद आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर, माजी आमदार रवींद्र फाटक, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मारोती मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ९४ वर्षीय जेष्ठ समाजसेवक-कामगार नेते डॉ. बाबा आढाव आझाद मैदान येथे आमरण उपोषणाला बसणार!

मुंबई, :- माथाडी अधिनियम, १९६९ सुधारणा विधेयक क्रमांक ३४ हे माथाडी कायदा संपुष्टात आणणारे आणि सुमारे ८०% माथाडी कामगारांना बेरोजगार करणारे असल्याने ते मागे घ्यावे आणि शासनाच्या पणन विभागाने काढलेले दि.१६ जानेवारी, २०२४ चे परिपत्रक मागे घ्यावे तसेच माथाडी कामगारांच्या इतर न्याय्य प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी तातडीने मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपमख्यमंत्री गृह व वित्त, कामगार मंत्री, कामगार, पणन, गृह विभागाचे अधिकारी यांची माथाडी कायदा बचाव कृती समितीबरोबर संयुक्त बैठक आयोजित करावी या मागणीसाठी महाराष्ट्रातील तमाम माथाडी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणारे प्रमुख माथाडी कामगार संघटनांचे नेते व कार्यकर्ते दि.२६ फेब्रुवारी सकाळी ९:०० वाजल्यापासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण आंदोलन करणार आहेत.

जेष्ठ समाजसेवक - जेष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव व माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय माथाडी कायदा बचाव कृती



Dr. BABA ADHAV SHASHIKANT SHINDE NARENDRA ANNASAHEB PATIL

समितीच्यावतिने हे आंदोलन करण्यात येणार असून, या कृती समितीमध्ये आमदार शशिकांत शिंदे, आमदार भाई जगताप, गुलाबराव जगताप, बळवंतराव पवार, अविनाश रामिष्टे, अरुण रांजणे, शिवाजी सुर्वे, निवृत्ती धुमाळ, नंदाताई भोसले, लक्ष्मणराव भोसले, दत्ता घंगाळे, सतीशराव जाधव आदी नेत्यांचा समावेश आहे.

माथाडी अधिनियम, १९६९ सुधारणा विधेयक क्र.३४ मागे घेऊन या अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार सल्लागार समितीची व विविध माथाडी मंडळांच्या पुनर्रचना करुन अनुभवी कामगार नेत्यांची सदस्य म्हणून नेमणुक करावी, विविध माथाडी मंडळात माथाडी कामगारांच्या शिकलेल्या मुलांचीच भरती करावी, माथाडी अधिनियमाचा दुरुपयोग केला जात आहे, त्यासंदर्भात माथाडी कायदा बचाव कृती समितीने दिलेल्या सूचनांनुसार उपाययोजना होणे, शासनाच्या कामगार, पणन विभागाकडून माथाडी, वारणार, मापाडी कामगारांवर अन्याय करणारे शासन जीआर काढले आहेत ते तातडीने मागे घ्यावे, असे जीआर काढण्यापूर्वी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणा-या संघटनांना विश्वासात घेतले जात नाही तसेच हिवाळी अधिवेशाना दरम्यान नागपूर येथे झालेल्या बैठकितील निर्णयाची अंमलबजावणी होत नाही याकरीतां आणि राज्य सरकार दिलेला शब्द पाळत नसल्याच्या निषेधार्थ हा आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड आज लातूर जिल्हा दौऱ्यावर

लातूर, (जिमाका) : केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.



भागवत कराड आज रविवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा बीड येथून चिखली तालुका अहमदपूर जिल्हा लातूरकडे प्रयाण. दुपारी १ वाजता चिखली तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या शाखचे उद्घाटन. दुपारी २-३० चिखली येथून ता. अहमदपूरकडे प्रयाण. दुपारी ३-१५ वाजता अहमदपूर येथे वसुंधरा रत्न राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज संजीवन समाधी लिंग स्थापना सोहळा . दुपारी ४-३० अहमदपूर येथून लातूरकडे प्रयाण. सायंकाळी ६ वाजता लातूर येथे आयकॉन सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती. सायंकाळी ७-३० वाजता माजी नगरसेविका दीपाताई गीते यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट . रात्री ९ वाजता लातूर येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण.

## राज्यातील विविध आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांचे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन आणि राष्ट्राला समर्पण

मुंबई, : सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरविण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे राज्यातील आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. या प्रकल्पांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी, दि. २५ फेब्रुवारी रोजी दुरदृष्य प्रणालीद्वारे विविध आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांचे भूमिपूजन आणि राष्ट्राला समर्पण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य व कुटुंब कल्याण आणि रसायने व खते मंत्री डॉ. मनसुख मांडविया, केंद्रीय आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण आणि आदिवासी व्यवहार राज्यमंत्री डॉ. भारती प्रवीण पवार, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणराज्यमंत्री प्रो. एस. पी. बघेल, आयुष आणि महिला व बाल विकास राज्यमंत्री मुंजपरा महेंद्रभाई, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव नवीन सोना, आयुक्त धीरज कुमार दुरदृष्य प्रणालीद्वारे कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आणि पाहण्यासाठी https://pmindiawebcast.nic.in या लिंकला क्लिक करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

## महाबळेश्वर येथे विभागीय नाट्य संमेलनाचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

सातारा (जिमाका) : महाराष्ट्राला कला आणि संस्कृतीचा अत्यंत गौरवशाली वारसा लाभला आहे. कला आणि संस्कृतीशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नाट्य संस्कृतीला अधिक बळकट करण्यासाठी राज्यात ७५ नाट्यगृहे अद्ययावत करण्यात येणार आहेत. यामध्ये ५२ नाट्यगृहांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून उर्वरित नाट्यगृहे नव्याने उभारण्यात येणार आहेत . ती सर्व सुविधा संपन्न असावीत व परिपूर्ण असावी यासाठी अकरा तज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. रंगभूमी मध्यवर्ती संघटना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन महाबळेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरी या ठिकाणी संपन्न होत आहे. या नाट्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले.

**ठसका**

कोण जा त्यात तर कोण सुपात आहे
दडपशाहीचा हा लोकशाहीवर डल्ला आहे
भ्रष्टाचाऱ्यांना आश्रय दिला जातो
स्वाभिमानावर मात्र हल्ला आहे
झुकले नाहीत जे त्यांच्यापुढे
त्यांना तुरुंगात टाकले जाते
गळ टाकला जातो ईडीचा
आणि सुरुंगास लावले जाते
लाचारांच्या फौजा जमा करतो
तो तर एकमेव मिंधा आहे
स्वाभिमान अन निष्ठा विकणाऱ्यावर
सारे जग आता शरमिंदा आहे

**- विजय वाठोरे, नांदेड**
**९९७५५९३३५९**

# औसा मतदारसंघातील विकास कामासाठी २७ कोटी ७ लक्ष निधी मंजूर..

औसा - आमदार अभिमन्यू पवार यांच्या



पाठपुराव्यामुळे मतदारसंघात विकास कामे झपाट्याने मार्गी लागत असून त्यांच्या प्रयत्नातून मतदारसंघात विविध योजनेतून २७ कोटी ७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.या निधीतून औसा शहरातील ९१ विकासकामांसाठी १६ कोटी ८५ लक्ष तर खरोसा लेणी परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.या विकास निधीतून औसा शहरातील मुलभूत विकास कामे केली जाणार असून खरोसा लेणी परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास केला जाईल. तर जिल्हा वार्षिक योजना रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत औसा विधानसभा मतदारसंघातील दुरावस्था झालेल्या २० वेगवेगळ्या ग्रामीण मार्गांची व इतर जिल्हा मार्गांची सुधारणा करण्यासाठी ५ कोटी २२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष निधी या योजनेअंतर्गत औसा शहरातील ९१ विकासकामांसाठी १६ कोटी ८५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.या निधीतून महात्मा फुले नगर येथील दत्त मंदिराशेजारील खुल्या जागेत सभागृह बांधणे, मातंग समाज स्मशानभूमी शेड व संरक्षण भिंत बांधकाम करणे, भीमनगर येथील स्मशानभूमी शेड व संरक्षण भिंत बांधकाम करणे, बौद्ध नगर येथील स्मशानभूमी शेड व संरक्षण भिंत बांधकाम करणे, गोपाळपूर शेजारील मराठा समाज सभागृह बांधकाम करणे, बसस्थानक ते मुक्तेश्वर मंदिर पर्यंत नाली बांधकाम करणे, हिरेमठ संस्थान येथे सभागृह विस्तारीकरण करणे, वीर हनुमान मंदिर ते भुसार वेस हनुमान मंदिर पर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे, तहसील कार्यालय ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, मुक्तेश्वर मंदिर ते एमआयडीसी जोडरस्ता करणे इत्यादी कामांसह ९१ मूलभूत विकासकामे केली जाणार असून यामुळे शहराच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे.

खरोसा लेणी परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी ५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. औसा विधानसभा मतदारसंघाला खरोसा लेणीच्या रूपात अत्यंत समृद्ध ऐतिहासिक ठेवा लाभला आहे. खरोसा लेणी परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी निधी मंजूर व्हावा यासाठी आमदार अभिमन्यू पवार मागच्या काही महिन्यांपासून पाठपुरावा करत होते. या पाठपुराव्याला यश आले असून खरोसा लेणी परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी हा निधी मंजूर झाला आहे. तर आमदार अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून जिल्हा वार्षिक योजना रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत औसा विधानसभा मतदारसंघातील दुरावस्था झालेल्या २० वेगवेगळ्या ग्रामीण मार्गांची व इतर जिल्हा मार्गांची सुधारणा करण्यासाठी ५ कोटी २२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून कार्ला ते कार्ला तांडा रस्ता, कासारसिरसी वाडी जोडरस्ता डांबरीकरण, हासोरी बु उस्तुरी रस्ता, कुमठा ते कुमठा तांडा रस्ता, चिंचोली काजळे ते टाका पाटी रस्ता, हासोरी ते उस्तुरी रस्त्यावरील पुलाचे काम व जोडरस्ता काम, उजनी ते आशीव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण, दावतपूर पाटी ते दावतपूर तालुका हद्द रस्ता व जोडरस्ता काम, प्रजिमा-१७ निलंगा ते रामा २४० सिंदखेड गुंजरगा चांदोरी टाकळी इजिमा- ९१ चिलवंतवाडी कासार बालकुंदा रामा-२३७ ते राज्य सिमा रस्ता डांबरीकरण करणे. (चांदोरीवाडी जोडरस्ता), इजिमा-९९ ते भीमा नाईक तांडा ते सेलू येथील शिवरस्ता ते ग्राम या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, याकतपूर सारोळा रस्ता, मदनसुरी ते पिंपळवाडी रस्ता, जमालपुर हिप्परसोगा रस्त्यावरील नाल्यावर पुलाचे बांधकाम करणे,येळवट ते तळणी रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे, चिंचोली (सोन) जोडरस्ता, गरड वस्ती मासुर्डी रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे, याकतपूर करजगाव रस्त्यावर याकतपूर गावाजवळ नाली बांधकाम करणे, याकतपूर करजगाव रस्ता सुधारणा करणे, एकंबी तांडा ते एकंबी रस्त्यावरील पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे. नागरसोगा गाढवेवाडी तळणी रोड रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे आदी कामे केली जाणार आहेत.

## शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या दुष्काळी उपाययोजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका) : जिल्ह्यात तसेच विभागातही दुष्काळी परिस्थिती आहे. ही परिस्थिती पुढील कालावधीत अधिक तीव्र होत जाणार



आहे. या कालावधीत शासनातर्फे उपाययोजना केल्या जाणार आहेत. याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी. या उपाययोजना राबविताना त्यात मदत पुनर्वसन क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक सेवाभावी संस्थांना सहभागी करुन घ्या, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सुभेदारी विश्रामगृह येथे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दुष्काळी उपाययोजनांबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, जिल्हा उपनिबंधक मुकेश बारहाते, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी रमेश भिसे, एच.पी. देशमुख, धनाजी धोतरकर, पुष्कराज तायडे, रमेश कुटे, मारोती बनसोडे, ज्ञानेश्वर हनवते तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, शासनाच्या ऑक्टोबर २०२३ च्या निर्णयानुसार दुष्काळी उपाययोजना जसे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ करणे, शेतकऱ्यांकडून सक्तिची कर्ज वसुली थांबविणे, शेती कर्जाचे पुनर्गठन करणे, वीज देयकांची वसूली थांबविणे, टँकर तात्काळ सुरू करणे आदी उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. शासन करत असलेल्या उपाय योजना बाबत जनतेपर्यंत माहिती पोहोचवावी. पुढील हंगामापर्यंत (जून पर्यंत) कर्ज वसूली थांबविण्याची प्रक्रिया सुरु करा, असेही त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ लातूरच्या वतीने गुरु रविदास जयंती उत्साहात साजरी

लातूर: येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा शाखेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील गुरु रविदास मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी या प्रभागाचे माजी नगरसेवक तथा व्ही एस पँथर्स संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सचिन भाऊ मस्के हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी के मुरळीकर मराठवाडा उपाध्यक्ष इंजी एन डी शिंदे पुरोगामी चळवळीतील नेते प्रा हर्षवर्धन कोल्हापुरे, प्रसिद्ध उद्योजक दिगंबर गवळी,बालाजी साबळे माजी केंद्रप्रमुख तथा लसाकम नेते नरसिंग घोडके इंजी श्रीधर शेवाळे रेनापुर पंचायत समितीचे माजी सभापती रमेश सोनवणे दुसंचार समिती सदस्य संजय सोनकांबळे ,राजकुमार बनसोडे पप्पू बनसोडे ॲड संजय सुरवसे महाराष्ट्र आर्यन सेनेचे संस्थापक अध्यक्ष अविराजे निंबाळकर प्रवीण नाबदे,सूर्यकांत रायकोडे पत्रकार नितीन चालक चंद्रकांत कांबळे नेताजी राऊत परमेश्वर कांबळे नंदकुमार बनसोडे



सह चर्मकार बांधव उपस्थित होते.

यावेळी सर्व मान्यवरांच्या वतीने गुरु रविदास यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर गुरु रविदास मंदिरात उपस्थित सर्व मान्यवरांचा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला यानंतर पुरोगामी चळवळीतील विचारवंत प्राध्यापक हर्षवर्धन कोल्हापुरे, इंजी श्रीधर शेवाळे इंजी एन डी शिंदे संजय सोनकांबळे माजी सभापती रमेश जी सोनवणे यांनी यावेळी मार्गदर्शन केले . या समारोहाचा अध्यक्षीय समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन भाऊ मस्के यांनी केला.

यानंतर समाजातील सर्व उपस्थित लोकांना घेऊन जाऊन गुरु रविदास चौक नामफलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

गुरु रविदास जयंती समारोह यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवि कुरील जिल्हा कार्याध्यक्ष अनिल कबाडे जिल्हा सचिव लक्ष्मीकांत खरटमोल, संघटक बालाजी शेरखाने ,गटाई कामगार अध्यक्ष परमेश्वर कांबळे आदींनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष रवी कुरील यांनी केले तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत खरडमल यांनी केले

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – शरद पवाराच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तुतारी निवडणूक चिन्ह मिळाल्याने, शिंदे, फडणवीस, पवार गटात आनंद उत्सव साजरा होताना दिसतो आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या चाणक्य नीतिचा पर्दाफाश होतो की काय अशीच काळजी वाटते. काहीच कळत नाही. डोकं सुन्न झालय.

दुसरा – अरे, कोणत्याही गटात किंवा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कळपातही उत्साह निर्माण झाला असला तरी, शरद पवार यांना काहीच फरक पडत नाही. कारण शरद पवार या नावातच एवढी ताकद आहे की, ते राजकारणात असेपर्यंत शरद पवार जिथे जातील तिथं ते यशस्वी होतातच हे लक्षात ठेव.

एक – अहो, नाहकपणे शरद पवाराची टीमकी वाजवू नका. पुतणे अजित पवार यांनीच त्यांचे जिरविली आहे. मग त्यांच्या चाणक्यनीतीचे काय घेऊन बसलात. महाराष्ट्रात तरी शरद पवार यांचे काही खैर नाही असे चित्र दिसते आहे.

दुसरा – अरे, घर का भेदी, घर लंका जाळ. अशीच अवस्था असते. कुराडीचा दांडा, होतास काळ. म्हणतात तसाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या बंडातला प्रकार आहे.

एक – अहो, काही असले तरी तुतारीचा आवाज फुसकाच ठरणार झाला. अशीच आजची शरद पवार यांची स्थिती झाली आहे. हे राजकीय वर्तुळातील चित्र दिसते आहे हे पक्केच.

दुसरा – अरे, नाव तुतारी असले तरी युद्धात, यशस्वी सोहळ्यात, राजाच्या आगमनाप्रसंगी तुतारी सिंग फुंकून सावध केले जाते. स्वागत केले जाते, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळापासून तुतारी प्रसिद्ध असून सांस्कृतिक साहित्य क्षेत्रातही कवी केशवसुत यांची एक तुतारी द्या मज कोणी अनुनी. ही आव्हानात्मक कविता समाज कुत्सित समाज व्यवस्थेवर घाव घालणारी होती. आजघडीला भाजपा मोदी सरकारने महाराष्ट्रातील फडणवीस, शिंदे, पवार हे काही करीत आहेत त्यावर रामबाण म्हणून तुतारीचा योग्य वापर शरद पवार करणारच झाले आणि हीच तुतारीवाला शरद पवार हेही इंडियाला यशस्वी ठरतील हेच वास्तव आहे. अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

## काय बोलता राव !

मराठा आरक्षणाबाबत मौनी बाबा बनलेले उपमुख्यमंत्री अजित पवार हे संभाजीनगर दौऱ्यावर आले असता मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाच्या आरक्षण काढणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले असताना, जरांगे पाटील ओबीसी मधूनच आणि तेही सग्या सोयऱ्या सकट कुणबीस प्रमाणपत्रासह आरक्षण अशी मागणी करून आंदोलन करीत आहेत. त्यावर पत्रकाराच्या प्रश्नाला बगल देऊन राजकीय विषयावर भाष्य करण्याचे टाळून आरक्षण संदर्भात मोनी बाबा बह्लयाने पुन्हा आश्चर्य व्यक्त होताना दिसते आहे.

**काय बोलता राव,**

अरे, मुळातच जरांगे पाटील हा खेळविता पोपट आहे. तो स्वतःचे, मनाचे बोलत नाही. कारण हा जरांगे पाटील आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, यांनाच आदेश, धमकी देतो आहे. हे करा, ते करा म्हणतो आहे. उद्याला सर्वोच्च न्यायालयानाही आदेश देण्यासाठी तो मागेपुढे बघणार नाही. म्हणूनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी जरांगे यांनी आता अट्टाहास सोडावा असाच गर्भित इशारा दिला असल्याने, जरांगेची नांगी ठेचली जाण्याचीच शक्यता वर्तवली जाते आहे. मग बोला दाजीबा

## दादरमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन दिवाळी अंक पारितोषिक वितरण

मुंबई (रवींद्र मालुसरे) – काशिनाथ धुरु ट्रस्ट व दादर सार्वजनिक वाचनालय आणि १९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि यावर्षी चळवळीचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई या संस्थेच्या वतीने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर जन्मदिवस आणि मराठी भाषा गौरव दिन मंगळवार, २७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता दादर येथे साजरा करण्यात येणार आहे. विख्यात लेखक, अभिनेते आणि सुजाण विचारवंत दीपक करंजीकर, साहित्यप्रेमी आणि ज्येष्ठ स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी, ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षप्रमुख आणि विशेष कार्यअधिकारी मंगेश चिवटे, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते निलेश कोळसकर, पार्थ फाउंडेशनचे अध्यक्ष व मनसे विभाग प्रमुख यशवंत किल्लेदार, सुप्रसिद्ध शल्य विशारद डॉ. प्रीतम पाठारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे असतील. या कार्यक्रमात संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या ४९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. 'मनोरंजनकार का. र. मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' म्हणून 'सकाळ अवतरण' यासह राज्याच्या विविध भागातील उत्कृष्ट दिवाळी अंकांना स्व. विजया मनोहर कोळसकर स्मृती 'अमृतप्रेरणा' पुरस्कार, ग्रंथ तुमच्या दारी या उपक्रमाचे जनक नाशिकचे विनायक रानडे यांना स्व. दत्ता कामथे स्मृती 'ग्रंथसखा' पुरस्कार, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत 'माझ्या बोलीभाषेचे मराठी साहित्य आणि व्यवहारातील स्थान' आणि पार्थ फाउंडेशन पुरस्कृत 'मराठी भाषेची चिंता आणि चिंतन' या विषयावर स्वबोलीभाषेत कुसुमाग्रजांना पत्र या दोन राज्यस्तरीय लेख स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

### अव्वल शैक्षणिक संस्थासह मानवी संसाधनाचेही सर्वोत्तम केंद्र म्हणून नागपूरला विकसित करू

नागपूर, : अखिल भारतीय पातळीवरील नावाजलेल्या सर्व क्षेत्रातील संस्था नागपुरात याव्यात, इथल्या गुणवंताना अशा संस्थामधून संधी मिळावी यासाठी सुरुवातीपासून आमची आग्रही भूमिका राहिली आहे. याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी भक्कम साथ दिली. या प्रयत्नातून नागपूर येथे एम्स, भारतीय तंत्रज्ञान संस्थान, राष्ट्रीय विधी विद्यापीठ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसारख्या संस्था इथे साकारता आल्या.

# मन जिंकणारे मनोहर जोशी!

## संपादकीय...

हिंदू तत्त्वज्ञान किंवा जातीयवादी मनुसंस्कृतीचा विचारातील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा, शिवसेना अशा पक्षात कार्यरत असलेले मंडळी ही लोकशाही, सामाजिक न्याय, समानता, धर्मनिरपेक्ष मानणारे अनेक व्यक्ती होत्या. त्यापैकी मनोहर जोशी यांचे नाव घेणे क्रमप्राप्त ठरते. कसे जगावे, काय करावे, कोणाला चांगले आणि वाईट ठरवावे. गरीब, श्रीमंत, उच्च,नीच स्पर्श, अस्पृश्य ही भेदभाव करणाऱ्या मनुसंस्कृतीने आणि जाणवेसीने तसे संस्कार लादले असले तरी त्याच वळण, संस्कृती राहू नही, शिवसेनेचा आवाज बुलंद करताना मनोहर जोशी यांनी माणुसकी, सामाजिक न्याय, समानतेच्या रेषा कधी ओलांडली नाही. हीच त्यांची कार्य ताकद आठवणच त्यांना खरी श्रद्धांजली, आदरांजली ठरू शकते असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

समाज सुधारक प्रबोधनकार ठाकरे यांचे पुत्र असलेल्या बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा नारा घेऊन शिवसेना स्थापन केली असली आणि त्यांच्यासोबत कार्यरत असतानाही मनोहर जोशी यांनी प्रबोधनकार केशव बळीराम ठाकरे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे न्यायिक नातेसंबंध लक्षात ठेवूनच बाळासाहेब ठाकरे यांचा विश्वास संपादन करूनच ते कार्यरत राहिले. हा त्यांचा कार्यकाल अस्मरणीय ठरावा असे म्हटल्यास वावगे ठरू नये असेच मतप्रदर्शन होताना दिसते आहे. कारण हिंदुत्ववादी पगडा असला तरी मानव धर्म महत्त्वाचा असतो. विविध जाती धर्मातील लोकांचे आचरण, विचरण, भाषा कृती वृत्ती वेगळी असली तरी मानवी प्रकृती सारखीच असते. विकृती वेगळी असू शकते पण रक्तासह अवयवात फरक नसतो हेच गुणसूत्र आत्मसात करून जानवी संस्कृती आणि ठाकरे प्रवृत्तीमुळे मनोहर जोशी शेवटपर्यंत शिवसेनेचा एक निष्ठावंत कार्यकर्ता, शिवसैनिक म्हणूनच ते आजवर समशानभूमीत जाईपर्यंत कार्यरत राहिले. यातच त्याचे यशस्वी जीवन ठरावे असाच बोलवाला होताना दिसतोय तो विस्मरणीय ठराव असे म्हटल्यास वावगे ठरू नये अशीच लोक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे, ती अव्हेरता येण्यासारखी नसावी.

शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळात भाजपाचे अस्तित्वच सुन्यात होते. त्यावेळी भाजपाचे लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, मनोहर जोशी ही समवयस्क मंडळी हिंदुत्ववादी होती. पण बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे नव्हती. त्यामुळे जाती धर्माच्या बाबतीत ते तडजोडीतूनच हिंदुत्वाचा पुरस्कार करीत होते. शिक्षकी पेशातूनच शिवसेनेच्या माध्यमातून नगरसेवक बनलेल्या जोशी सरांना मुंबईचे महापौर, आमदार, विरोधी पक्ष नेते, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष, अशी सत्ता स्थाने भूषवूनही त्यांना त्या पदाचा गैरफायदा न घेता त्या, त्या पदाची लौकिकता अस्तित्व आणि त्या पदाची इभ्रत सांभाळूनच त्या, त्या पदावर कार्यरत राहिले. असे ते मन जिंकणारे मनोहर जोशी हे एक लोकप्रतिनिधी, शासक म्हणूनच आजवर लोकसभेत राहिले हे विसरता कामा नये. अशीच लोकभावना व्यक्त करताना दिसते आहे.

मराठवाडा विद्यापीठ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असे नामाभिधान करण्याचा ठराव विद्यापीठ सिनेटनेच घेतला होता. परंतु नको आणि हवेच असा वाद सुरू झाला तो १९७८ चा काळ होता. शिवसेनेचे सरसेनापती हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी, घरात नाही भाकरीचे पीठ आणि कशाला मागता विद्यापीठ अशी दलित, आंबेडकरी जनता आंबेडकरवादी समूहाची खिल्ली उडवली ते पुन्हा काही वर्षाच्या संघर्षानंतर नामांतराऐवजी नामविस्तार झाला आणि मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले तर गोपीनाथ मुंडे गृहमंत्री बनले त्यावेळी नामांतरवादी आणि नामांतर विरोधी कार्यकर्त्यावरील सारे खटले मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी माघार घेतली. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे ही निशब्द झाले होते. यातच मनोहर जोशी यांचे मानवी मने जिंकण्याचे कसब लक्षात येते, असा सर्वसामान्यातून स्पष्ट होताना दिसतो आहे. हीच मनोहर जोशी यांच्यासाठी आदरांजली ठराविक असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, सिख, दलित, अल्पसंख्याक असणे हा गुन्हा नाही. पण चातुर्वर्ण्य म्हणून संस्कृती समाज व्यवस्थेने जे भेदभाव निर्माण केले, तेच मानवी संस्कृतीला, मानवता, माणुसकीला काळीमा फासणारीच बाब होती, आहे. पण हिंदू ब्राह्मण असूनही प्रबोधनकार ठाकरे सामाजिक न्यायाचे, समानतेचे पुजारी बनले. पण त्यांचे पुत्र बाळासाहेब ठाकरे हे कट्टर हिंदुत्ववादी, जातीयवादी राहिले. पण त्यांच्याच नेतृत्वाखाली आयुष्य वेचलेल्या मनोहर जोशी यांनी हिंदुत्ववाद जोपासतानाही, तमाम जाती, धर्माच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना मोफत क्लासेसची मोहीम, कोहिनूर म्हणून चालविली आणि त्यांच्या कार्यातूनही धर्मनिरपेक्षता, माणुसकी जोपासली. आज ते आपल्यात नाही परंतु त्यांची कृती वृत्ती मात्र सोबत आहे. हिंदुत्वातूनही पुरोगामीतत्व, सत्ता येते हेच त्यांनी मुख्यमंत्री ते लोकसभा अध्यक्ष पदावर कार्यरत असताना दाखवून दिले. हेच वास्तव ठरते.

# बाबासाहेब, यु आर ग्रेट...

**.सध्या आरक्षणावर खूप मोठ्या प्रमाणात सर्वत्र चर्चा होताना दिसते आहे. बाबासाहेबांनी या देशाला खूप काही दिले आहे.त्याची परतफेड कुणीही करू शकत नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व,आणि बरेच काही आम्ही विसरणार नाही. प्रश्न पाण्याचा असो की मंदिराचा, बाबासाहेबांनी सारं काही पेटवून मोकळं केलं. शेती असो की तलाव त्याची न्यायसंगत मांडणी केली.न्याय देताना प्रत्येक प्रसंगाला विचारपूर्वक आणि गंभीरता पूर्वक न्याय दिला.प्रश्न स्त्रियांचा असो की पुरुषांचा त्यांना समान मानलं. बाबासाहेबांनी दाखवून दिलं,नेता कसा असावा? समाजसेवक कसा असावा? विद्यार्थी कसा असावा? खरे तर प्रत्येक भूमिकांना बाबासाहेबांनी न्याय दिला. बाबासाहेबांनी रुपयांचा प्रश्न मांडला. कामगारांचे ते नेता झालेत. अनेक प्रश्न मार्गी लावताना शिक्षण आणि आरक्षणाचा ही प्रश्न मार्गी लावला.त्यांनी शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे अशी व्यवस्था केली.आणि आवश्यक त्याला आरक्षण मिळाले पाहिजे ही देखील व्यवस्था केली. सारे काही पुरविण्याची व्यवस्था असलेला त्यांचा मौलिक ग्रंथ म्हणजे भारताचे संविधान.त्यात सगळ्यांना न्याय मिळेल अशी व्यवस्था केली.**

बाबासाहेबांनी आरक्षण देताना ज्यांनी ते नाकारलं आज ते नाकारणाऱ्या त्यांच्याच तत्कालीन पुढाऱ्यांना दोष देतायत. आणि आताशा तर ते फारच आक्रमक झालेत.आता मराठ्यांचंच बघा, सत्तेतील त्यांचा सहभाग मोठा.त्यांचीच माणसं सत्तेत तरीही एक मराठा लाख मराठा म्हणत लाखांचे मोर्चे निघाले.तसे मोर्चे काढतायत.मराठ्यांनी आता आरक्षणाचा मुद्दा खूपच ताणून धरला आहे. तिकडे धनगर समाजही रस्त्यावर उतरलाय. त्यांची मागणी रास्ता असली तरी त्यांना आमच्या वाट्यातून आरक्षण देऊ नये असा विरोध आदिवासी बांधवांनी नोंदवला.तिकडे मराठ्यांना आरक्षण मिळावं इकडे मराठ्यांना आरक्षण मिळावं ही सगळ्यांचीच इच्छा आहे.पण ते ओबीसी मधून देऊ नये यासाठी ओबीसी आणि ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे.

मराठ्यांना सरळ कुणबी प्रमाणपत्र मिळावे अशी आग्रही भूमिका घेऊन आरक्षणाची मागणी मराठ्यांनी रेटून धरलीय.तर कुणबी ही स्वतंत्र जात आहे त्यात कोणी मराठ्यांनी वाटेकरी होऊ नये असा युक्तिवाद सुरू आहे. तर काहीही झाले तरी आरक्षण घेणारच ही मराठ्यांची भूमिका आणि तेही ओबीसी मधूनच घेणार ही देखील मराठ्यांची भूमिका आहे .सध्या सकल महाराष्ट्र अशांत आहे .जाळपोळ, दंगा धोपा झाल्याची रोजचीच बातमी आहे. त्यातही काहींना सतत प्रसिद्धीच्या झोतात राहण्याची सवय झालीय त्यामुळे मुंबईत आरक्षण मिळालं म्हणून हाकाटी फिटणाऱ्यांनी परत आरक्षणासाठी उपोषण सुरू केले. सध्या काही समाजात आरक्षणासाठी ओढतान सुरू आहे. एक मी घेणार म्हणतो.तर दुसरा मी माझ्या हिश्याचं देणार नाही म्हणतो. आता तर जातीनिहाय आरक्षणाऐवजी वेगळीच संकल्पना मांडली गेलीय.ती कल्पना सगेसोयरे. ही वेगळीच सूचना करण्यात आलीय.सगेसोयरे ही कल्पना पुढे आली.

सगेसोयरे म्हणजे नेमके कोण हा सवाल अनेकांना पडलाय. २०/२/ २४ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वेक्षणाचा अहवाल मांडला जावा.त्यात गायकवाड आयोग आणि शुक्रे आयोगाच्या आधारे मराठा आरक्षणावर शिफारस करण्याची शक्यता होती. हे १३ टक्के आरक्षण होते.पण मराठा आंदोलकांनी सर्व मराठा हे कुणबी असून त्यांना ओबीसी मधूनच आरक्षण मिळावे म्हणून आग्रही भूमिका घेतली.म्हणजे जे स्वतः ला मराठा म्हणतात तेच स्वतःला आरक्षणासाठी कुणबी म्हणतात ही आरक्षण मिळविण्यासाठी घेतलेली कोलांउडी मजेदार वाटते.आम्हाला नाही पाहिजे भीक म्हणणारे कसेही करा पण आरक्षण द्या म्हणतायेत हे काळाच्या ओघातील परिवर्तन आहे. पण कायद्याच्या कचाट्यात हे अडकून पडले हे काय अशी शंका अनेकांना वाटते. तसेच मराठ्यांचे हे आरक्षण आंदोलकांच्या मागणीप्रमाणे कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याने ते कायदेशीर नाही असे अनेकांची मते आहेत. अनेक जाणकार ती मते मांडता आहेत सामाजिक न्याय विभागाने सगेसोयरे अशी दुरुस्ती करण्याच्या संदर्भात काढलेल्या अधिसूचनेला सहा लाखांपेक्षा अधिक हरकती आल्या आहेत.

२० फरवरी २०२४ च्या विधिमंडळ अधिवेशनात कायदा मंजुरीसाठी कोणी किती जोर लावला हे कळले.पण दिलेले हे आरक्षण न्यायसंगत नाही. ते यापुर्वी दिलेल्या आरक्षणासारखे असुन पुर्वीसारखेच ते न्यायालयात टीकणार नसल्याची मते जानकारांनी नोंदवली आहेत.मराठा आरक्षणाचा प्रवास १९८२ पासून सुरू झाला . २०१४ साली मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील सरकारने समितीच्या अहवालाच्या आधारे १६ टक्के आरक्षण दिले होते त्यानंतर देवेंद्र फडणवीस सरकारने गायकवाड आयोगाच्या माध्यमातून १६ टक्के दिलेले आरक्षण उच्च न्यायालयाने बारा टक्क्यावर आणले. आता एकनाथ शिंदे सरकारने ते दहा टक्क्यावर आणले आहे. हा टक्केवारीतील फरक सोडला तर पूर्वीच्या अहवालामध्ये आणि आताच्या अहवालामध्ये आरसा फरक नसल्याचे कायद्याचे अभ्यासक सांगतात.आधीचे ५२ टक्के आरक्षण आर्थिक मागासांसाठी असलेले दहा टक्के आणि आता मराठा साठीचे दहा टक्के धरून एकूण आरक्षण ७२ टक्के वर जाते त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात हे आरक्षण टिकण्याबाबत कायदे तज्ञांच्या मनात शंका. गायकवाड आयोगाने केलेल्या चुकी चुकांची पुनरावृत्ती करण्यात आली असून सर्वेक्षण केलेल्या लोकांची संख्या मोठी घेतली एवढी गोष्ट आरक्षण टिकण्यासाठी पुरेशी नसल्याचे तज्ञांचे मत आहे.आणि सगेसोयरे कायदा मंजूर करणे ही तारेवरची कसरत झालीय.

मराठा आरक्षणाच्या विरोधात गुणरत्न सदावर्ते नी न्यायालयीन लढाई सुरू केली आहे.सध्या सोशल मीडियावर मराठा विरुद्ध वकील गुणरत्न सदावर्ते असा सामना बघायला मिळतोय. सदार्ते यांनी कायदेशीर भूमिका घेतली आहे. त्यात किती यश अपयश आले किंवा येईल ते सर्व पाहिले तर कायद्याच्या बाजूला किती महत्व आहे हे लक्षात येईल.सोशल मीडियावर काही मराठा बांधव बाबासाहेब काय आम्हाला आरक्षण देणार आम्हीच म्हणजे शाहू महाराजांनी त्यांना आरक्षण दिले असं म्हणणारे ही हातबल झालेत. कारण आरक्षणाची योग्य–अयोग्यता संविधानाच्या आधारे तपासली जाणार आहे.शाहू महाराजांनी फक्त बाबासाहेबांना एकट्यांना सवलत, मदत दिली.पण बाबासाहेबांनी फार मोठा दिलदारपणे दाखवला.त्यांनी सगळ्यांना सवलतीची तरतूद केली. सगळे सुस्तावलेले लोक आता उठायला लागले आहेत. हजारो वर्ष इथला बहुजन समाज स्वतःला उच्चवर्णीय समजण्याचा बालिशपणा करीत राहिला. पण हा समाज कोण आणि कसा आहे हे बाबासाहेबांनी सांगितले.आज इतकी वर्ष झाली तरी हा समाज एकमेकांना शत्रूंच्या नजरेने बघतोय.

त्यामुळे प्रत्येकांच्या वाट्याचं प्रत्येकांना मिळायला हवं अशी व्यवस्था संविधानात बाबासाहेबांनी केली. हजारो वर्षे स्वतःच्या नशिबाला दोष देत जगणारे लोक आता आपला हिस्सा मागतात.अनेकांनी मंदीर उभारले. तिथे लोक देवभोळे झाले.आणि बाबासाहेबांनी संविधान दिले आणि लोक हक्कासाठी जागे झाले.बाबासाहेब तुम्ही झोपलेल्या माणसांना जागवलंत.सारे आपला वाटा मागतायत पण तुमच्या संविधानाशिवाय काही देता येत नाही.यु आर ग्रेट बाबासाहेब!

**राजू बोरकर-७५०७०२५४६७,**
**मु.पो.ता.लाखांदूर,जिल्हा - भंडारा.**

## रेडिओचा आवाज हरपला

बहनो और भाईयो, अगले पायदान पर है ये गाना.... असे म्हणत अनेक वर्ष रेडिओ वर बिना का गीतमाला हा कार्यक्रम सादर करून आपल्या शैलीदार आणि रसाळ निवेदनाने संगीत प्रेमिंच्या गळ्यातील ताईत बनलेले जेष्ठ निवेदक अमीन सयानी यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने रेडिओचा आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही कारण अमीन सयानी यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रेडीओवर निवेदन करून संगीत प्रेमींना मंत्रमुग्ध केले. एकेकाळी अमीन सयानी यांनी आवाज की दुनिया के दोस्तों.... अशी स्नेहपूर्ण साद घालून रसिकांच्या मनावर आणि हृदयावर बिना का गीतमाला या प्रचंड लोकप्रिय कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक वर्ष राज्य गाजवले. अमीन सयानी यांनी रेडिओ सिलोन आणि त्यानंतर विविध भारतीच्या माध्यमातून आपल्या जादुई आवाजाने श्रोत्यांच्या मनावर पाच दशकं अधिराज्य गाजवले. त्यांचा बिना का गीतमाला हा कार्यक्रम घराघरात ऐकला जायचा. श्रोते बिना का गीतमाला या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहायचे. अमीन सयानी यांच्या आवाजाने संगीत रसिकांच्या चार पिढ्यांवर गारूड केले. रेडिओ निवेदनाला खऱ्या अर्थाने वलय प्राप्त करून देणाऱ्या अमीन सयानी यांनी आपल्या निवेदनाने देश विदेशातील स्टेज शो देखील गाजवले. अमीन सयानी यांनी केवळ निवेदन केले नाही तर अनेक गायक, गीतकार, संगीतकार यांना मुलाखतीच्या निमित्ताने बोलते करून त्यांच्या गाण्याचा सृजनशील प्रवास ध्वनिमुद्रित केला. माझा आवाज फुटला नाही म्हणून मी गाऊ शकलो नाही ती सगळी कसर मी भरपूर गाणी ऐकून भरून काढली असे त्यांनी एका मुलखतीत सांगितले होते. अमीन सयानी यांचा जन्म गुजराथी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील व्यवसायाने डॉक्टर होते. त्यांचे शिक्षण मुंबई व ग्वाल्हेर येथे झाले. लहानपणापासूनच त्यांना गाण्याची आवड होती. रवींद्र संगीतातील गाणी देखील ते म्हणायचे. हिंदी, उर्दू, पंजाबी, बंगाली, संस्कृत या भाषा त्यांना अवगत होत्या. एक दिवस ओवल टाईन फुलवारी या कार्यक्रमाच्या निवेदकाची तब्येत अचानक बिघडल्याने कार्यक्रमासाठी निवेदन करावे अशी गळ आयोजकांनी अमीन सयानी यांना केली. त्यांनी त्या कार्यक्रमाचे यशस्वी निवेदन केले. पुढे त्यांना अनेक कार्यक्रमासाठी निवेदन करण्याच्या ऑफर येऊ लागल्या. खर्जातिल आवाज, शुद्ध उच्चार, हिंदी भाषेवरील पकड यामुळे त्यांचे निवेदन लोकप्रिय होऊ लागले. त्याच दरम्यान रेडिओ सिलोनने हिंदी गाण्यांच्या कार्यक्रम घेण्याचे निश्चित केले. या कार्यक्रमाला बिना का गीतमाला असे नाव देण्यात आले. या कार्यक्रमात निवेदन करण्यासाठी अमीन सयानी यांची निवड झाली. आठवड्याला २५ रुपये इतके मानधन रेडिओ सिलोन ने त्यांना देऊ केले. १९५२ साली सुरू झालेला हा कार्यक्रम अल्पावधीतच लोकप्रिय झाला. बिना का गीतमाला लोकप्रिय होण्यामागे सर्वाधिक वाटा होता तो अमीन सयानी यांचा. तीन दशकांहून अधिक काळ हा कार्यक्रम रेडीओवर सुरू होता. हिंदी चित्रपट संगीताच्या इतिहासात बिना का गीतमाला कार्यक्रम माईल स्टोन ठरला. बिना का गीतमाला सोबतच त्यांनी रेडिओवर अन्य कार्यक्रम देखील केले. संपूर्ण आयुष्यात त्यांनी ५४००० पेक्षा अधिक रेडिओ कार्यक्रमाचे निवेदन केले. आवाजाचा अनभिषिक्त सम्राट अशीच त्यांची ओळख निर्माण झाली. आवाजाचा अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखल्या गेलेल्या अमीन सयानी यांच्यासारखा निवेदक पुन्हा झाला नाही, होणार नाही. या सम हा अशी प्रतिभा असलेला हा निवेदक आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. रेडिओचा आवाज बनून संगीत रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या अमीन सयानी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुण,९९२२५४६२९५**

# दयाराम सुडे महाराष्ट्र शासनाचा कृषी पुरस्काराने सन्मानित. : ग्रीन लातूर वृक्ष टीम

लातूर : ग्रीन लातूर वृक्ष टीमचे सन्माननीय सदस्य श्री. दयाराम जगन्नाथ सुडे रा. हरंगुळ ता. जि. लातूर या गावातील राहिवाशी असून नुक्ताच महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या कृषी पुरस्कार मध्ये श्री सुडे यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार २०२२ (सर्वसाधारण गट) प्राप्त झाला आहे त्याबद्दल ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे त्यांचे कौतुक आणि खूप खूप अभिनंदन.

श्री दयाराम सुडे यांना शेती फार जास्त नाही परंतु जि आहे ती नक्कीच पाहण्यायोग्य, अनुकरणीय, शेती आणि शेतीमाधील नवनवीन यशस्वी प्रयोग . त्यांचे शेतामध्ये आंबा, सीताफळ आणि ड्रॅगन फ्रुट इत्यादी फळबाग असून सर्व फळबागेचे संगोपन आणि वेळेवर आवशक्ते प्रमाणे खतपाणी, फवारणी, अंतर्गत मशागत हीं सर्व कामे ते स्वतः जातीने करतात. संपूर्ण क्षेत्र फळबागेखाली असल्यामुळे त्यांना अंतरपीक घेतल्या शिवाय पर्याय नाही अंतरपीक म्हणून प्रामुख्याने गहू, ज्वारी आणि हरबरा हीं पिके घेतात.

लातूर जिल्हा हा दुष्काळी किंवा कमी पावसाचा जिल्हा म्हणूनच या जिल्ह्याची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे. कमी शेती आणि कमी पाऊस यामुळे शेती परवडत नाही हा अलिखित नियम मोडीत काढत, श्री सुडे यांनी योग्य पाण्याचे नियोजना करीता आहे तेवढ्याच शेतीच्या क्षेत्रा मध्ये १०० १०० आकाराचे शेततळे घेतलेले असून संपूर्ण शेती ड्रीप



द्वारे ओलीताखाली आणलेली आहे, त्यामुळे पाण्याची बचत तर होतेच आणि बाग हीं अतिशय चांगल्या प्रकारे भिजवल्या जाते.

पारंपारिक शेती नकरता शेतीला आधुनिकतेची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी शेतीसाठी ट्रॅक्टर खरेदी करून त्यांच्या शेतीसाठी उपयोगी मशागतीचे साहित्य स्वतः फॅब्रिकेटर यांच्या सोबत बसून तयार करून घेतली आहेत, तुकमुळे कमी वेळेत, कमी इंधनात आणि अतिशय चांगल्या प्रकारे शेतीचे कामे पूर्ण होऊ लागले.

रासायनिक शेती कडून शेंद्रीय शेती हीं काळाची गरज हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी शेतामध्ये स्लरी तयार करून ती स्लरी फिल्टर द्वारे शेतातील पिकांना देण्याची सुरुवात केली आहे त्यामुळे हळू हळू विशमुक्त शेती हेच त्यांचे ध्येय्य आहे.

शेतीमध्ये यांत्रिकीकरणामुळे त्यांचा बराचसा वेळ वाचू लागला त्यावेळेचा सदुपयोग करून त्याने गावरान कोंबड्याचे कुकूटपालन सुरु केले, अतिशय कमी खर्चात त्या कोंबड्यांचे पालन पोषण करण्याकरिता त्यांनी अतिशय छान युक्ती वापरली आहे, लातूर शहराच्या जवळ गाव असल्याचा त्यांना फायदा झाला आहे, लातूर मधील हॉटेल्स मध्ये चिरलेल्या वेस्टेज भाज्या, उरलेले अन्न हे या कुकूटपालणातील कोंबड्याचे अन्न त्यामुळे कोंबड्याच्या खाद्यावर होणारा खर्च शून्य रुपये, त्यातून त्यांना एक उत्पन्नाचा मार्ग सापडला.

मेहनतीच्या जोरावर श्री दयाराम सुडे यांनी स्वतः ची ओळख एक प्रगतीशील शेतकरी म्हणून हरंगुळ परिसरात केली, तसेच ते कृषीमित्र म्हणून हीं परिचित आहेत. हरंगुळ आणि जवळपासच्या खेड्यामध्ये तर कृषिमित्र म्हणून कार्य हीं करतात, शासकीय बीज नोंदणी, शासकीय योजना, शासकीय औषध वाटप अश्या कित्तेक योजना तसेच बीज प्रक्रिया, रोग आणि प्रतिबंधात्मक औषधे हे सर्वकाही शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात किंवा त्याचा लाभ मिळून देण्याचे कामात सक्रिय असतात.

श्री दयाराम सुडे हे केवळ कृषी विषयकच कार्य करत नसून ते आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या नात्याने ग्रीन लातूर वृक्ष टीम सोबत मागील १७३० दिवसापासून अविरत सेवेत कार्यरत आहेत, सकाळी ५.३० ते ९ ते लातूर शहर हरीत, स्वच्छ आणि सुंदर राहावे यासाठी तन मन धनाने कार्यरत असतात, त्याच बरोबर वाहतूक नियंत्रक पोलीस प्रशासनास मदत करणे करीता ते ट्रॅफिक अँम्बेसेडर म्हणून सुद्धा कार्यरत आहेत.

त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वी श्रेयस रोटरी क्लब तर्फे पर्यावरण रक्षक पुरस्कार, रोटरी क्लब लातूर तर्फे सेवा पुरस्कार, रयत प्रतिष्ठान महाराष्ट्र तर्फे वृक्ष रक्षक पुरस्कार, द्वारकादास श्याम कुमार यांच्यामार्फत, लायन्स क्लब लातूर यांच्यामार्फत विविध पुरस्काराने गौरवण्यात आलेले आहे, त्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार २०२२ (सर्वसाधारण गट) प्राप्त झाल्याचे औचित्य साधून ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने श्री दयाराम जगन्नाथ सुडे यांचा सत्कार करून शुभेच्छा देत पुढील प्रत्येक पाऊल प्रगतीच्या दिशेने पाडवे हीं सदिच्छा व्यक्त केली. यावेळी ग्रीन नातू लक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, डॉ. भास्कर बोरगावकर, पद्माकर बागल, राहुल माने, सिताराम कंजे, आदित्य स्वामी, रवी तोंडारे, गणेश सुरवसे, ओंकार सगरे, आकाश चिल्लरगे यांनी शुभेच्छा दिल्या. श्री दयाराम सुडे यांनी हा पुरस्काराचे श्रेय त्यांचे आई वडील आणि पत्नी तसेच त्यांच्या वेळोवेळी मदतीला धावून जणाऱ्या प्रत्येक व्यक्ती मुळेच प्राप्त झाल्याचे मत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

## हे शक्य आहे,आधी स्वत:ला सागां न्यूनगंड न बाळगता पुढे जा -प्रशांत गिरबन

लातूर, (जिमाका) : आज लातूरचे अनेक युवक जगभरात उच्चपदावर काम करत आहेत, काही शेकडो कोटी रुपयांच्या उलाढालीचे उद्योग व्यवसाय करत आहेत. ही तीच मुलं आहेत, जी आज तुमच्यासारखी सायकलवर शाळेत जात होती ही तीच मुलं आहेत, जी आज देशात येणाऱ्या परकीय चलनात भर घालत आहेत. शिक्षण सामर्थ्य देते, कौशल्य त्या सामर्थ्याला बळ देतं हे जितकं खरं आहे. तितकेच मला हे करणं शक्य आहे, हे आधी स्वत:ला सांगितले पाहिजे. तसेच कुठलाही न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पाऊल पुढे टाकले पाहिजे, असे अनुभवाचे बोल आज विभागीय नमो महारोजगार मेळाव्यात मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे महासंचालक प्रशांत गिरबने यांनी सांगितले. उद्योग आणि उद्योजकता म्हणजे काय ? या विषयावर श्री. गिरबने उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. सुरुवातीला माजी कौशल्य विकास मंत्री आमदार संभाजी पाटील – निलंगेकर यांनी लातूरचे सुपूत्र असलेल्या श्री.गिरबने यांचा परिचय करून दिला. कामात कितीही व्यग्र असले आणि वेळ देता येत नसला, तरी मी लातूरचा आहे. हा पासवर्ड सांगितला की श्री. गिरबने यांची वेळ नक्कीच मिळते असं एक गुपितही श्री. निलंगेकर यांनी यावेळी सांगितले.

लातूर ते लंडन असा प्रवास करणाऱ्या गिरबने यांनी आपल्या वाटचालीतील अनुभव आज मेळाव्यास उपस्थित युवक युवतींसमोर मनमोकळेपणाने सादर केले. कोणतेही काम किंवा कौशल्य याला महत्व दिले गेलेच पाहिजे, तुम्ही काय शिकता यापेक्षा ते कसं शिकता यालाही महत्व आहे. वेल्डिंग, फिटर, टर्नर, इलेक्ट्रिशियन, थ्रीडी प्रिंटर ऑपरेटर यासारख्या अनेक क्षेत्रात खूप नोकऱ्या उपलब्ध आहेत. मग त्या मिळत का नाहीत हा मुलभूत प्रश्न आहे, ज्याच्याकडे लक्ष द्यायला हवे, यासाठी गरज आहे उद्योग आणि कंपन्यांच्या मागणीप्रमाणे मनुष्यबळ विकसित करणे याला. उद्योजकांना जाऊन भेटणे, उद्योग, कंपन्यांमधील रोजगार संधींचा शोध घेणे या गोष्टी प्रत्येकाने करायला हव्यात. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रापलिकडेही खूप रोजगार संधी आहेत ज्याचा शोध आपण घेतला पाहिजे. यासाठी रोजगार मेळाव्यासारखे व्यासपीठही खूप महत्वाचे आहे, त्यामुळेच आजच्या या कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित होते. मरिन इंजिनिअरिंगसारख्या क्षेत्रात वेल्डिंगचे स्पेशलाईज्ड स्किल लागते, ते काम अतिशय कौशल्याचे आहे तिथल्या वेल्डरला असा भला मोठा पगार मिळतो हे कुणाला खरे वाटेल का ? असा प्रश्न करून त्यांनी उपस्थितांना अनेक उदाहरणांसह रोजगार संधींमधील कौशल्याचे महत्व, रोजगार संधींचा शोध, त्याची गरज सांगितली. जगभरात इंग्रजी भाषेला व्यावसायिक भाषा म्हणून स्वीकारले जाते, त्यामुळे मातृभाषेचा अभिमान बाळगताना, व्यावसायिक भाषा म्हणून इंग्रजी भाषा येणंही गरजेची असल्याचे प्रतिपादनही त्यांनी केले. रोजगार मागणाऱ्यांपेक्षा रोजगार देणारे व्हायला हवे, पदवीपर्यंत शिक्षण घेतलेली मुलं आज आत्मविश्वासाच्या, कष्टाच्या आणि प्रयत्नाच्या बळावर शेकडो कोटी रुपयांच्या उद्योग व्यवसायाची धुरा सांभाळत असल्याची अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी दिली. रोजगार संधीची उपलब्धता करून देणारे असे कार्यक्रम निरंतर व्हायला हवेत, ती काळाची गरज आहे, अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांनी मला हे शक्य नाही म्हणण्यापेक्षा अशक्य काहीही नाही, मी हे करू शकतो हे स्वत:ला सांगत, मी कोणताही न्यूनगंड बाळगणार नाही, हे समजवायला हवे, असे झाल्यास लातूरकरही मोठी पाऊले टाकू शकतो, हे स्पष्ट केले.

# शेतीकडे सकारात्मक आणि व्यावसायिकदृष्टीने पहाण्याची आवश्यकता- विलास शिंदे

**लातूर, (जिमाका) : गुंतवणूकीच्या तुलनेत निर्माण होणारा रोजगार याचा विचार केला तर शेतीसारखं क्षेत्र शोधून सापडणार नाही. फक्त आता शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक आणि व्यावसायिक होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे विलास शिंदे यांनी केले. विभागीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात 'कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम' या विषयावर ते बोलत होते.**

तत्पूर्वी शेतीकडे पहातांना केवळ शेती करणे एवढेच मर्यादित स्वरूपात न पाहता कशापद्धतीने त्याला कृषी पूरक व्यवसायाची जोड देऊ शकतो, त्यात नावीन्यता आणता येते हे श्री. शिंदे यांनी दाखवून दिल्याचे श्री. शिंदे यांच्या परिचयात आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. श्री. शिंदे यांनी व्यग्र दिनक्रमात मराठवाड्याच्या मातीसाठी वेळ दिल्याबद्दल त्यांनी आभारही व्यक्त केले. विलास शिंदे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे या कार्यक्रमास मार्गदर्शन केले.

अडीच एकर–तीन एकरच्या क्षेत्राला इंडस्ट्रीसारखे बघून उत्पनादन आणि उत्पन्नाचे नियोजन करायला हवे, असे सांगून श्री. शिंदे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राचा ८० टक्के भाग कोरडवाहू आहे. शेती म्हणजे धान्य किंवा कापूस पिकवणे नव्हे. शेतीचे मूल्यवर्धन करून त्याला फार्म इंडस्ट्रीचे स्वरूप त्याला द्यायला हवे. त्यातील नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे. डिजिटल अग्रीक्लचर मार्केटिंग हे शेती व्यवसायाचे भविष्य असून आज ग्रो स्टार्टअप्समध्ये आयआयटी–



आयआयएमवाले शिरकाव करून रोजगार निर्माण करत आहेत. परंतू आपल्याकडे शेती हा विषय आला की प्रामुख्याने त्यातील नकारात्मक बाबींवर चर्चा होते.

आजच्या तरूणांना गाव सोडायचे आहे, शेती सोडायची आहे, ग्रामीण भागातील मुलगी ही शेतकरी नवरा नको म्हणते आहे, थोडक्यात काय तर शेती आणि शेती रोजगार नको अशी एक मानसिकता तयार होऊ लागली आहे. त्याची अनेक कारणं आहेत त्यापैकी एक महत्वाचे कारण म्हणजे शेतीचे उत्पन्न शाश्वत राहिले नाही. त्यामुळे गुंतवूणक करून, वेळ देऊन, कष्ट करून हक्काचे उत्पन्न मिळत नाही असे दिसते. त्या उलट एखाद्या नोकरीकडे आपण बघतो तर एक हमखास पगाराची रक्कम दर महिन्याला घरात येते. त्यामुळे सोपे करिअर, सुरक्षितता याकडे माणूस वळायला बघतो, तसे प्रयत्न करतो, असे श्री. शिंदे म्हणाले.

एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहाते. त्यातील ४५ टक्के लोक महाराष्ट्रात शेतीवर अवलंबून आहे. या सगळ्यांनी शेती सोडली तर साधारणत: यातील ३० ते ३५ टक्के युवा वर्गाला आज शेती सोडून इतर क्षेत्रात रोजगार उपलब्ध होतील, का ही एक प्रश्न आहे, सरकारी नोकरीतही मर्यादा आहेत. कंपन्यामध्ये तयार होणाऱ्या नोकऱ्यात ऑटोमेशनमुळे मर्यादा येत आहेत. खरं तर जे पुणे– मुंबईत शोधल्या जातं, अमेरिकेत शोधलं जातं त्यापेक्षा कितीतरी संधी तुमच्या भागात आसपास आहेत. फक्त गरज आहे शेतीकडे वेगळ्या नजरेने, सकारात्मकदृष्टीने बघण्याची. जगभरात जिथे समस्या तिथेच नवीन नोकऱ्या, रोजगार निर्माण झाले हे चित्र आहे, प्रत्येक संकटात एक संधी दडलेली असते त्या नजरेने शेतीकडे पाहिले तर शेतीक्षेत्राएवढ्या रोजगार संधी कोणत्याच क्षेत्रात नाहीत. तुमच्या गावात, आसपास हजारोनी अशा संधी तुम्हाला सापडतील. यात व्यक्तिगत करिअर घडवू शकता, इतरांच्या हाताला काम देऊन तुमच्या भागात समृद्धी आणू शकता. मराठवाड्यातील तरूण तरूणींनी या नजरेतून शेतीकडे पाहण्याची गरज आहे, असे श्री. शिंदे यांनी सांगितले.

इस्त्राईल सारख्या देशाने अनेक अडचणींवर मात करत, प्रादेशिक स्थितीवर मात करत ठिबक सिंचन आणि इतर संशोधने केली ती संशोधने जगभर विकली गेली. इस्त्राईलच्या बाहेर मोठ्याप्रमाणात व्यवसाय उभे केले. जगभरातून संपत्ती गोळा केली. हीच मानसिकता आपल्याकडे तयार होण्याची गरज आहे. पाणी समस्या, उष्ण वातावरण हे इस्त्राईलमध्येही होते. पाणी नाही ही एक नवी संधी आहे, कमी पाण्यातील, कोरड्या मातीतील पिक घेण्याची. अन्न पदार्थ पोषक, पोषणमुल्याने युक्त आहे का याचा विचार आज होत आहे. लोकांना विषमुक्त शेतीतील अन्नधान्य हवं आहे. लोक साखरेचे सेवन कमी करत आहेत. जगभरात सर्वोत्तम फळं भाज्या कोरड्या वातावरणात येतात. कमी पाण्यात जास्त उत्पन्न मिळते. हे आपण पहात आहोत. अशा स्थितीत फळे, भाजीपाला, बांबू, डाळिंब असे कितीतरी कमी पाणी लागणारी उत्पादने मराठवाड्यात घेता येतील. जागतिक बाजारात मागणी असलेली उत्पादने घेता येतील पिकांचे गाव, तालुका आणि जिल्हानिहाय नियोजन करता येईल. असेही श्री. शिंदे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले.

## विभागीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मागदर्शन शिबिरात प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी सांगितले स्पर्धा परीक्षेतील यशाचे गमक

लातूर, (जिमाका) : कोणत्याही स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे. तसेच ते ध्येय प्राप्त करण्यासाठी महाविद्यालयीन जीवनापसूनच जोखून देवून प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी नमन गोयल यांनी सांगितले. महाविद्यालयीन जीवन आणि त्यानंतरची एक–दोन वर्षे सर्व बाबींचा त्याग करून अभ्यासाला महत्व द्यावे, असे त्यांनी सांगितले.

आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सोशल मिडिया, तसेच इतर करमणुकीच्या साधनांपासून काही दिवस दूर राहून अभ्यास केल्यानंतर यश हमखास मिळाले. दोन–तीन वर्षांच्या त्यागामुळे आयुष्यातील पुढील ४०–५० वर्षे सुखाचे आयुष्य जगायला मिळेल. त्यामुळे आपल्या ध्येयप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी सर्वस्व पणाला लावून प्रयत्न करावेत, असे श्री. गोयल म्हणाले.

आयुष्यात यशस्वी व्हायचे आहे, तर कष्टाला पर्याय नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कष्टाची तयारी ठेवूनच स्पर्धा परीक्षेचा पर्याय निवडावा. या परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी ध्येय ठावून त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी नवदीप अग्रवाल यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनीही यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना



परीक्षेची तयारी कशी करावी, याबाबत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन शिबिराला उपस्थित विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

करिअरमध्ये नियोजन महत्त्वाचे : डॉ. राजीव रंजन स्टार्टअपमधील संधी व आव्हाने याबाबत मार्गदर्शन

जिद्द आणि एखादी गोष्ट करण्याची धमक असल्यास कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करू शकतो. करिअर निवडताना ध्येय निश्चित करण्याची गरज आहे. करिअरमध्ये नियोजन महत्त्वाचे आहे, असे मत राजीव रंजन यांनी व्यक्त केले. 'स्टार्टअपमधील संधी व आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत गणेश देसाई यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना राजीव रंजन म्हणाले, आजच्या प्रचंड धकाधकीच्या जीवनात ताण–तणाव व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. शारीरिकदृष्ट्या सक्षम राहिले तर यशाचा प्रवास अधिक सोपा जातो. पैशाने सर्व काही गोष्टी खरेदी करता येत नाहीत. आनंदी आयुष्य जगणे ही कला प्रत्येकाने आत्मसात केली आहे. यावेळी कुणाल क्षीरसागर यांनी टॅक्सबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

'वैद्यकीय क्षेत्रात करिअरच्या संधी'बाबत मार्गदर्शन

वैद्यकीय क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. कोणत्याही क्षेत्रात पुढे जायचे असेल तर कष्टाला पर्याय नाही. एखादे क्षेत्र जर आपण निवडले तर त्या क्षेत्रात मास्टरी मिळविल्याशिवाय मागे हटायचे नाही, असा कानमंत्र डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी नमो महारोजगार मेळाव्यात आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात बोलताना दिला. 'वैद्यकीय क्षेत्रात करिअरच्या संधी' बाबत मार्गदर्शन केले. वैद्यकीय क्षेत्रासह आयुर्वेदिक, होमिओपॅथी याही क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. लातूरने अनेक डॉक्टर घडविले आहे. यावेळी बोलताना डॉ. पल्लवी जाधव म्हणाल्या, जिद्द आणि चिकाटीने यश हमखास मिळविता येते. युवकांनी शिक्षणाबरोबर कौशल्ये वृद्धिंगत करणे आवश्यक आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात रोजगार संधीचा खजिना – रोहित पंढारकर

लातूर, (जिमाका) : शिक्षण, आरोग्य, संरक्षण, कृषी, माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, मनोरंजन यासारख्या सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता महत्वाचे योगदान देत आहेत. या क्षेत्रात येत्या तीन वर्षात जगभरात ४० लाख नोकऱ्यांची संधी आहे, अशी माहिती ओलएक्सचे डेटा सायन्सचे ग्लोबल हेड रोहित पंढारकर यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय, त्यासाठी कोणते शिक्षण घ्यायला हवे आणि त्यातून कोणते रोजगार मिळू शकतील याची माहिती त्यांनी आज लातूर येथील विभागीय नमो महारोजगार मेळाव्यात दिली. सुरुवातीला श्री. पंढारकर यांच्या वाटचालीचा परिचय माजी मंत्री संभाजी पाटील – निलंगेकर यांनी करून दिला.

जगभरात या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची गरज आहे. भले मोठे पगार या क्षेत्रातील लोकांना मिळणार आहेत, भारतात सुद्धा या क्षेत्रात काम करण्याची मोठी संधी आहे, असे सांगतांना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय ?

याचा अर्थ खूप साध्या सोप्या शब्दात समजून सांगितला. ते म्हणाले इन्स्टाग्रामवर तुम्ही एखाद्या रिलला लाईक करता, त्यानंतर तुमच्या लक्षात येतं की, त्याच विषयावरच्या इतर रिल तुमच्यासमोर तुम्ही न मागताही समोर येत आहेत म्हणजे काय तर तुमची आवड संगणकाने कोडमध्ये जतन करून ठेवली आहे, तुम्ही क्रिकेट विषयावरील रिल लाईक केली तर सचिन तेंडुलकर, धोनी आणि इतर क्रिकेटरच्या रिल्स तुमच्यासमोर तुम्ही न शोधताही येतात.. कारण तुम्हाला काय आवडतं याचा अंदाज किंवा भाकित संगणकाने किंवा मोबाईलने लावलेलं असतं आणि त्याच विषयावरील इतर गोष्टी ते तुमच्यासमोर सादर करत.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा मशिनकडून आलेली हुशारी. हवमानाचा अंदाज, तुमच्या हृदयाची गती सांगणारी यंत्रणाही अशाच पद्धतीने काम करते, ज्यामुळे अनेक संकट किंवा धोके टाळण्यास, अनेकांचे प्राण वाचवण्यात यश आल्याचेही ते म्हणाले. अनेक कंपन्यांची उत्पादनेही याच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या चाचणीवर पुढे येतात. कारण ग्राहकाची पसंती आणि गरज यांचे दोन्ही भाकित ते सांगू शकतात.

आपल्या अनेकप्रकारच्या मशिन्समध्ये आपल्याला त्याच्या चालू बंद असण्याचे संकेत मिळतात. वाहन चालवतांना इंधन उपलब्धता दर्शवली जाते या आणि यासारख्या अनेक गोष्टी या याच कृत्रिम बुद्धिमत्तेतून आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग दाखवतात. त्यामुळे या क्षेत्रातील संधी लक्षात घेऊन करिअरसाठी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

# करिअर मार्गदर्शन शिबिरामुळे हजारोंना मिळाली रोजगाराची संधी मराठवाड्यातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर, (जिमाका) : राज्य शासनाने प्रत्येक महसूल विभागात नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून छत्रपती संभाजीनगर विभागाचा मेळावा लातूर येथे २३ व २४ फेब्रुवारी रोजी पार पडला. शासकीय महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानात झालेल्या या नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरा त मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील युवक–युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. २४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीमधून उद्योजकांनी ४ हजार ५४८ उमेदवारांची जागेवरच निवड केली. तर ७ हजार ८९७ जणांच्या निवडीबाबतची कार्यवाही पुढील टप्प्यात होणार आहे. यावेळी झालेल्या करिअर मार्गदर्शन शिबिरालाही युवा वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

जागेवर निवड झालेल्या युवक–युवतींना आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात निवडपत्राचे वितरण करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, प्रेरणा होनराव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात मुख्यमंत्री



रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत ३५ जणांना १ कोटी ५१ लाख ७६ हजार रुपये, मुद्रा योजना अंतर्गत ५ व्यक्तींना १८ लाख रुपयांचे धनादेश उपस्थितांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. या मेळाव्याचे औचित्य साधून जिल्हा परिषद अंतर्गत १४ संवर्गात अनुकंपा तत्वावर निवड झालेल्या १० युवक–युवतींना एकाच वेळेस यावेळी नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले.

इयत्ता दहावी ते पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या युवक–युवतींना एकाच छताखाली रोजगाराच्या संधी आणि स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. २३ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे या मेळाव्याचे उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संदेश दाखविण्यात आला, तसेच कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा दिल्या. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार सुधाकर शृंगारे, आमदार रमेश कराड, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार उपस्थित होते. पहिल्या दिवशी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी करिअर विषयी मार्गदर्शन केले.

२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ पासूनच रोजगार इच्छुक उमेदवारांची नाव नोंदणी आणि प्रत्यक्ष मुलाखतींना सुरुवात झाली. स्वतंत्र सभामंडपात १६ दालनांमध्ये ३२ टेबलवर नाव नोंदणीची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच उमेदवारांनी भरलेले अर्ज स्वीकारण्यासाठी १४ दालनांमध्ये २८ टेबलची व्यवस्था करण्यात आली होती. या मेळाव्यासाठी ऑनलाईन स्वरुपात १८ हजार ५३० उमेदवारांनी नोंदणी केली. तर ऑफलाईन स्वरुपात १२ हजार ९४५ जणांनी नोंदणी केली. तसेच ७ हजार २८८ जणांनी स्वयंरोजगारसाठी नाव नोंदणी केली होती. सकाळपासूनच नाव नोंदणीसाठी युवक–युवतींची गर्दी पाहायला मिळाली. यावेळी आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी नाव नोंदणी कक्षांना भेटी देवून युवक–युवतींशी संवाद साधला. तसेच विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनीही विविध दालनांना भेटी देवून मुलाखतीला आलेल्या उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतानुसार उपलब्ध उद्योजक, आस्थापनेची आणि त्यामधील रिक्त पदांची माहिती देण्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी मदत कक्ष तयार करण्यात आले होते. तसेच सर्व आस्थापनांची एकत्रित माहिती असलेला फलक दर्शनी भागात लावण्यात आला होता. विविध आस्थापना, उद्योजक यांच्या दालनांसाठी दोन स्वतंत्र सभामंडप उभारण्यात आले होते. यामध्ये तयार करण्यात आलेल्या कक्षांमध्ये उमेदवारांच्या मदतीसाठी एक–एक स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले होते. २६४ उद्योग, स्वयंरोजगारविषयक आस्थापनांची दालने याठिकाणी तयार करण्यात आली होती. राज्य शासनाने प्रत्येक विभागामध्ये नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून युवा वर्गाला करिअरच्या अनुषंगाने भविष्याची वाटचाल निश्चित करण्यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार आहे. नागपूरनंतर आता लातूर येथे असा मेळावा होत असून यानंतर राज्यात प्रत्येक महसूल विभागात मेळावे होणार आहेत. या मेळाव्याचे अतिशय चांगले नियोजन झाले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून तीन युवतींना प्रत्येकी सुमारे अडीच लाखांचे पॅकेज मिळाले आहे. याचप्रमाणे इतरही उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. याठिकाणी मिळालेल्या मार्गदर्शनातून भविष्यातील संधींचा वेध घेण्यासाठी आत्मविश्वास युवकांना मिळेल. हा आत्मविश्वास युवा वर्गाला उज्ज्वल भविष्य देईल, असा विश्वास महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. या मेळाव्यात सहभागी युवक–युवतींना दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आगामी काळ हा कौशल्य विकासाच्या कार्यक्रमांचा आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षण घेतलेल्या युवक–युवतींसाठी नमो महारोजगार मेळावा उपयुक्त ठरणार आहे. जगातल्या अनेक कंपन्या शाश्वत गुंतवणुकीसाठी भारतात येत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यावसायिक, उद्योग जगतात विश्वास निर्माण केल्याने उद्योजकांची भारताला पसंती मिळत आहे. तसेच राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासामुळे उद्योगांची संख्या वाढणार आहे. अशा उद्योगात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नमो महारोजगार मेळावे उपयुक्त ठरतील, असे महसूल मंत्री श्री. विखे–पाटील यांनी सांगितले. लातूर येथील नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिराच्या यशस्वी आयोजनाबाबत त्यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894